# माता न तू वैरीणी

नेहमी असे म्हटले जाते की बायकाच बायकांच्या शत्रू असतात हे किती खरे आहे. सासू ही सुनेला छळणारी हे चिरंतन सत्य झालंय. हल्ली सुना पण सासवांना 'आता आयुष्य पुरे' असे म्हणायची वेळ आणतात. सवती मत्सर ही नैसर्गिक भावना आहे. पण सासू, नणंद, जाऊ यांचा नव्या नवरीबद्दल आकस, दुष्टावा कशाला? आपले प्रेमाचे माहेर सोडून पतीच्या नव्या घरी आलेल्या नववधूला तिच्या गुणदोषासकट आपली म्हणून प्रेम देणे हे सासरच्या मंडळींचे कर्तव्य नाही का? आणि तिनेही माहेरचा मोठेपणा किंवा कमीपणा मनात न ठेवता सासरी समरसून जायला नको का? काही वेळा ती समजूतदार असते, पण दोन्ही बाजूंच्या मातोश्री आडमुठेपणाने वागून तिचे सहजीवन हैराण व शेवटी वैताग करतात. मी हे उगीचच म्हणत नाही. माझ्या प्रिय मैत्रिणीच्या बहिणीची शोकांतिका मला हे सांगायला प्रवृत्त करते आहे.

प्रेमा माझी बालपणापासूनची जिवाभावाची मैत्रीण. कैऱ्या, चिंचा चिमणीच्या दाताने खाऊन आम्ही मोठ्या झालो. तिच्या माझ्यात काहीच आडपडदा नव्हता. मनातले बरे-वाईट विचार एकमेकीला सांगायचे व विचारपूर्वक चांगले काय ते ठरवायचे. शाळा, कॉलेज, नोकरी आम्ही एकत्रच केली. तिचे लग्न माझ्या नातेवाईकाबरोबर झाले तेव्हा मीच तिच्या लग्नात मिरवले. ही ६३-६४ सालची गोष्ट! ती लग्न करून अमेरिकेत गेली. त्यानंतर आमचे संबंध दुरावले. त्यावेळी आता सारख्या टेलिफोन इंटरनेटसारख्या सुविधा हाताशी नव्हत्या. त्यामुळे सुरुवातीला दर महिन्याला होणारा पत्रव्यवहार हळूहळू रोडावला. गप्पाही रेंगाळत गेल्या व कधी बंद झाल्या हे समजलेच नाही. मी पण माझ्या संसारात रमले. कधी तरी दोन तीन वर्षांनी ती आईवडिलांना भेटायला मुंबईला आली की उडती भेट व्हायची. पण बालपणी बांधले गेलेले मनाचे बंध किती अतूट व चिवट असतात हे आता जाणवते. आता दोघी संसारातून सुटवांग झालोत. अंशतः वानप्रस्थाश्रम म्हणायला हरकत नाही. आता आम्ही फोनवर किंवा इंटरनेटवर

सतत बोलत असतो. मधल्या वर्षांचा बॅकलॉग भरून काढत असतो. तर ह्या गप्पातूनच मला ही सुमनची शोकांतिका समजली. मन सुन्न झाले.

खरे म्हणजे प्रेमाची बहीण सुमन आमच्यापेक्षा चार वर्षांनी लहान त्यामुळे आम्ही तिला कच्चा लिंबू म्हणून लांब ठेवायचो. पण तिने कधी आमच्यात यायचा हट्ट केला नाही. प्रेमा मोठी व प्रीती धाकटी म्हणून दोघींची घरी दादागिरी असायची. सुमन व सुनिता मधल्या म्हणून दबलेल्या असायच्या. सुनिताला त्यांचा राग यायचा, पण सुमन सर्व समजूतदारपणे निभवायची. तिचा स्वभावच सहनशील होता.

प्रेमाचे लग्न ठरवताना तिच्या आईला परदेशचा जावई हवा होता. तो तिचा 'प्रेस्टिज पॉइंट' झाला होता. त्यामुळे प्रेमा लग्न करून अमेरिकेला गेली. त्यानंतर तिची भेट वरचेवर होत नाही. तिच्या बाळंतपणाचे सोपस्कार करता आले नाहीत. तिचे तिलाच सर्व करावे लागते इ. गोष्टीमुळे सुमनसाठी तिने इकडचाच नवरा बघायचा असे ठरवले. सुमन होती काळीसावळी पण अत्यंत तरतरीत! सुडौल बांधा, काळेभोर डोळे, तरतरीत नाक, दुळदार ओठ या सौंदर्याच्या अटीत काटेकोरपणे बसणारी, तिने एम.ए. केले होते. एका बँकेत ऑफिसर म्हणून काम करीत होती. तिचे लग्न चटकन ठरले. नवरा इंजिनीअर होता. एका चांगल्या कंपनीत उत्तम पगाराची नोकरी होती. लग्न छान पार पडले. लग्नानंतर तीन-चार महिने छान गेले. नंतर कुठेतरी बिनसू लागले.

प्रेमाची आई दुसऱ्यावर अधिकार गाजवणारी! तिचे राहणीमान तिच्या इतर जावा, नणंदा, वहिन्या यांच्यापेक्षा अधिक सुधारक! तिच्या केसात कायम गजरा असे. घरात किंवा बाहेर ती नेहमीच टिपटॉप असे. प्रेमाचे वडील गरीब बिचारे! ते वधू परीक्षेला गेल्यापासून जे प्रेमज्वराने पछाडले ते अजून त्यातून सावरलेच नाहीत. त्यामुळे तिचा 'हम करे सो...! असा अनिर्बंध कारभार चालू असे. ती सुमनला भेटायला सासरी गेली की त्यांचे फर्निचर फार जुने आहे. अँरेंजमेंट कशी चुकीची आहे असे तारे तोडत असे. ही जुनी डबल कॉट काढून टाक मी तुला नवीन कॉटस देते. हा सोफासेट गलथान दिसतो. त्या नव्या फर्निचरच्या दुकानात मी पाहिला आहे तो आणू या अशा सूचना देऊन सुमनला कानकोंडी व तिच्या सासूला तप्त करीत असे. शेवटी सासूने सुमनला दम देऊन सांगितले की आईला भेटायला तूच माहेरी जात जा. तिला आमच्या जुन्या फॅशनच्या घरात यायची गरज नाही. सुमन बिचारी अधिकच कानकोंडी झाली. आईला काही सांगायची तिची

हिंमतच नव्हती. सासूचे बोलणे ती निमूटपणे ऐकून घेत होती. त्यात धाकटी नणंद आईला चेव यायला मधूनमधून फोडणी घालायची. सुमनची ही अवस्था बघून सुभाषने आईला म्हटले, 'सुमनची काही तक्रार आहे का? तू तिला का बोलतेस? ते ऐकून सासूला राग आला. वडील गेल्यापासून कष्टाने तुम्हा दोघांना वाढवले. तुला चांगले शिक्षण दिले. आता या काळुंद्रीला भुलून आईला उलट उत्तर देतोस असा कांगावा करायला तिने सुरुवात केली. दोन्ही माता आपल्या अधिकारावर कोणाचे आक्रमण होऊ नये म्हणून रणरागिणी बनल्या होत्या. त्यांच्या शब्दांच्या अंगारानी आपल्या मुलांची कोवळी विवाहवेल करपून जाते आहे याचे त्यांना भानच नव्हते. हसायच्या फुलायच्या दिवसात दोघेही दिवाभिताप्रमाणे जगत होते.

प्रेमाच्या आईने आता आणखी एक प्रस्ताव मांडला. सुमन-सुभाषने दादरमध्येच एक ब्लॉक घेऊन स्वतंत्र बिऱ्हाड करावे. सुमनला बँकेतून सहज कर्ज मिळेल. मग तिला मनाप्रमाणे ब्लॉक सजवून (कोणाच्या?) राहता येईल. सुमन नेहमीप्रमाणे आईला काही बोलू शकत नव्हती, पण त्यामुळे सुभाषचा गैरसमज झाला. त्याला वाटले हीच आईच्या तोंडून आपल्या मनातले सांगते आहे. सुमनने त्याला जीव तोडून सांगितले तरी त्याला पटले नाही. एकुलता एक मुलगा विधवा आईला सोडून वेगळे बिऱ्हाड कसे करेल हे प्रेमाच्या आईच्या डोक्यातच आले नाही. आता सासूबरोबर नवऱ्याचेही मन कलुषित झाले. बिचारी सुमन!

सुमन आता सात महिन्यांची गरोदर होती. ती माहेरी बाळंतपणाला गेली. सुभाष घरी एकटा पडला. आई व बहिणीने सुमनविरुद्ध त्याचे कान चांगलेच भरले. त्याला घटस्फोट घे म्हणून मागे लागल्या. सुमन बाळंत झाली. मुलगा झाला. बाळाचे बारसे झाले. नाव राघव ठेवले. सासरहून कोणीच आले नाही. बाळाला दोन महिने झाले तरी सुभाष तिला किंवा बाळाला बघायला आला नाही. आता सुमनने दृढनिश्चय केला की, आपला संसार वाचवायचा असेल तर आपणच उठून सासरी गेले पाहिजे आणि एक दिवस ती बाळाला घेऊन सासरी गेली. सासूने रागाने तरीही नातवाच्या स्वार्थाने तिला घरात घेतली. सुमनने आपल्या आईला बजावले होते की तू माझ्या सासरी येऊ नकोस. तरी तिचे त्यांच्या संसारात नाक खुपसणे चालू होते. सुमनने बाळाला सांभाळायला व घरात सासूबाईंना मदत होईल म्हणून एक बाई कामाला ठेवली व ती ऑफिसला जाऊ लागली. थोडे दिवस बरे गेले. परत सासूची कटकट सुरू झाली की माझ्याने मुलाला सांभाळणे होत नाही. तू नोकरी

सोड. शेवटी सुमन रोज बाळाला आईकडे ठेवून नोकरीला जाऊ लागली. हळूहळू सासूने मुलाला असा काही पाठ पढवला की तो आई व बहीण एका खोलीत व सुमन बाळाला घेऊन दुसऱ्या खोलीत झोपू लागले. सुमनपासून त्याला तोडण्याचा तिचा प्रयत्न यशस्वी होऊ लागला. त्यात तिला विहिणीवर कुरघोडी केल्याचा आनंद मिळत होता. आपला मुलगा, सून याच्या आयुष्याचा विचारच नव्हता. तशात मुलीचे लग्न ठरले, पण तिने सुमनला त्यात भाग घेऊ दिला नाही. लग्नाचे विधी दिरजावेकडून करून घेतले, पण मुलगा, सून यांना ते करू दिले नाहीत. सुभाष व सुमनला वाईट वाटले, पण सुभाष आईपुढे काही करू शकत नव्हता. असे काही दिवस गेले. एक दिवस तिने सुमनशी भांडण करून तिला घरातून हाकलून लावले. ती आईकडे गेली. शेवटी घटस्फोटापर्यंत पाळी आली तेव्हा सुमनने आईला व सासूलाही सांगितले, ''मी घटस्फोट कदापि घेणार नाही.'' ती रोज ऑफिसला जाताना राघवला आईकडे ठेवायची. घरी आली की जेवून राघवला घेऊन सासरी जायची. तिला बाहेरच्या खोलीत झोपावे लागते. घरात कोणी तिला पाणी पण विचारत नसे, पण बाळाला त्याचे बाबा माहीत व्हायला पाहिजेत. भेटले पाहिजेत. त्यांच्यापासून त्याची ताटातूट होऊ नये म्हणून ती सर्व अपमान गिळून रोज अशी कसरत करत होती.

राघव आता चार वर्षांचा झाला. तो बालवाडीत जाऊ लागला. सुमनच्या मनावर सतत दडपण असे. सुखाचा प्रेमाचा शब्द यांना ती पारखी झाली होती. दोन्ही माता आपापसात वादंग माजवतच होत्या आणि त्यांची पिल्ले भित्री मांजरीची पिल्ले झाली होती. एक दिवस सुमनला सडकून ताप भरला. लहानपणापासून सुमन दणकट प्रकृतीची पण हा ताप कसाच उतरेना. डॉक्टरांनी तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करायला सांगितले. सर्व प्रकारच्या टेस्ट झाल्या, पण तापाचे निदान होईना. आई व धाकट्या बहिणी राघवला सांभाळत होत्या. दररोज मुलाला घेऊन घरी येणारी आपली पत्नी हल्ली येत का नाही अशी चौकशी करावी हे सुभाषला सुचले नाही. सासू म्हणाली बरे झाले बला टळली एकदाची! आता घटस्फोट दे. मी तुझे दुसरे लग्न करून देते. असे पंधरावीस दिवस गेले आणि एक दिवस केवळ तीस वर्षांची सुमन आपल्या लाडक्या बाळाला पोरकं करून पंचतत्त्वात विलीन झाली. तिच्या तापाचे निदान शेवटपर्यंत झालेच नाही. केवळ उपचार म्हणून प्रेमाच्या वडिलांनी तिच्या नणंदेच्या नवऱ्याला ही बातमी कळवली. त्याने सुभाषला कळवले. तो आपल्या बायकोला म्हणाला, 'हा खून आहे तुम्ही लोकांनी

केलेला!' सुभाष आतल्या आत खचला. एकांतात रडला. त्याला आता आपली, आईची चूक जाणवली, पण त्याचा काही उपयोग नव्हता.

कायद्यानुसार त्याला राघवचा ताबा मिळाला. प्रेमाच्या आईच्या हातात काहीच राहिले नाही. असेच थोडे दिवस गेले. सुभाषची आई त्याचे परत लग्न करून द्यायला बघत होती, पण सुमनच्या आईने सर्वत्र सासूने छळ केल्यामुळेच माझी तरणीताठी पोर गेली अशी दवंडी पिटली होती. त्यामुळे कोणी लग्नाला तयार होत नव्हते, पण सुभाष यात कशातच नव्हता. तो आता अंतर्मुख झाला होता. त्याचे सुमनवर व सुमनचे त्याच्यावर किती प्रेम होते याची जाणीव त्याला आता ती गेल्यावर झाली. त्याने आता राघव हेच आपले ध्येय ठरवले. राघवचे सर्व काम तोच करायचा. आईने काही सांगितले तर तो कानावर घेत नव्हता. त्याने राघवच्या शिक्षणाकडे, खेळाकडे व चौफेर प्रगतीकडे पूर्ण लक्ष दिले. त्याची पूर्ण वाढ, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कसे होईल याकडे लक्ष पुरवले. राघवने पण त्याला छान साथ दिली. मध्यंतरी त्याची आई वारली. त्याने घरात स्वयंपाकीण ठेवून स्वतः बाकी सर्व बघू लागला. मित्र त्याने जोडलेच नाहीत. नातेवाईक संबंध ठेवून होते. तेवढेच तो आपला संपूर्ण वेळ मुलालाच देत होता.

राघव नोकरीसाठी अमेरिकेत गेला. प्रेमामावशीने त्याला आग्रहाने आपल्याकडे बोलावले. तो वीकएन्डला तिच्याकडे जाऊ लागला. एकदा प्रेमाने त्याला त्याच्या आईची दुःखभरी कहाणी सांगितली, कारण त्याला ते कळणे आवश्यक होते. पुढे हेही सांगितले की, त्याच्या पप्पाने आपल्या वागण्याने पश्चात्तापाने आपले सर्व पाप धुवून काढले आहे. त्याने खरेच माझ्या बहिणीवर प्रेम केले म्हणून तर वयाच्या ३४ व्या वर्षापासून त्याने व्रतस्थ राहून तुला मोठे करण्यात आयुष्याचे सार्थक मानले. त्याच्या आयुष्याची इतिकर्तव्यता तुझ्यातच संपते. त्याला कधीही अंतर देऊ नकोस.

ही सर्व हकीकत प्रेमाच्या तोंडून ऐकताना मला त्या दोन्ही मातांबद्दल अतिशय चीड आली. त्यांचे वागणे आईपणाला कलंकच होता. माझ्या मनात विचार आला ह्या माता नाहीच वैरिणीच ठरल्या त्या दोन तरुण जीवांच्या!

(अन्नपूर्णा दिवाळी अंक, २००५)

– नलिनी करंडे